ई गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत होणाऱ्या खर्चास
प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण १७१९ /प्र.क्र.३०/क्रीयुसे-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
तारीख: २९ मार्च, २०१९

वाचा :

१. सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र. रकाप/संकेतस्थळ/२०१८-१९/क-१६; दि. १४.०२.२०१९

२. उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. उपसंक्री/ शिछपु१७-१८/२०१८-१९/का-२आ/६८८; दि. २२.०२.२०१९

प्रस्तावना :

ई गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र पुणे यांच्या मार्फत क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे संकेतस्थळ विकसित करण्यात आले असून Digital Age Strategies Pvt. Ltd., Banglore या कंपनी कडून सदर संकेतस्थळाचे Security Audit करण्यात आले आहे. NIC हा केंद्र शासनाचा उपक्रम असल्याने या कामासाठी झालेल्या खर्चास प्रशासकीय मान्यता देऊन सदर निधी वितरीत करण्याची विनंती आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पूणे यांनी दि. १४.०२.२०१९ च्या पत्रान्वये केली आहे. तसेच दि.१६.१०.२०१७ च्या शासन निर्णयानुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार व अन्य पुरस्कारासाठी www.mumbaidivsports.com या वेबसाईट वर लिंक देवून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. सदर वेबसाईट मुंबई विभागाची असून सन २०१८-१९ या वर्षाकरीता यावर शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार व अन्य पुरस्काराचे "वेब ॲप्लिकेशन" दरपत्रके मागवून निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांनी दरपत्रके मागवून त्यापैकी रु.२.९५ लक्ष दरपत्रक असलेल्या मे. मोबीसोल्यूशन टेक्नोलॉजीस या संस्थेची हे वेब ॲप्लिकेशन तयार करण्यासाठी निवड केली होती. सदर खर्चास प्रशासकीय मान्यता देऊन सदर निधी वितरीत करण्याची विनंती उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांनी दि २२.०३.२०१९ .च्या पत्रान्वये केली आहे.

उपरोक्त बाबींसाठी मान्यता देण्याची व निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या संकेतस्थळाचे Security Audit व शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ऑनलाईन अर्ज स्विकारण्यासाठी वेब ॲपलिकेशन तयार करण्यास प्रशासकीय मान्यता देत आहे तसेच संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या खाली दर्शविल्याप्रमाणे नमूद केल्याप्रमाणे खर्चास मान्यता देत आहे:-

अ.क्र.	**बाब**	**संस्था/कंपनी**	**रक्कम**
१.	क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे संकेतस्थाळाचे Security Audit करण्यासाठी झालेला खर्च	Digital Age Strategies Pvt. Ltd., Banglore	रु.४०,१२०/-
२.	शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार व अन्य पुरस्कार सन २०१७-१८ साठी www.mumbaidivsports.com या संकेतस्थळावरील सॉफ्टवेर अद्यावत करण्यासाठी झालेला खर्च	Mobeesolution Technologies	रु.२,९५,०००/-
	एकूण (रुपये तीन लाख पस्तीस हजार एकशे वीस)		**रु.३,३५,१२०/-**

उपरोक्त प्रमाणे **रु.३,३५,१२०/- (रुपये तीन लाख पस्तीस हजार एकशे वीस फक्त)** इतकी निधी वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च “मागणी क्र. ई-२, २२०२, सर्व साधारण शिक्षण, ८०, सर्व साधारण ८००, इतर खर्च (०२) संकीर्ण (०२) (५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२ H४५४), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) “ या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. वित्त विभाग दिनांक २५.०१.२०१९ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतुद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी उपसंचालक क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई /लेखाधिकारी/सहायक संचालक (लेखा) माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९१५३००८४०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.29 16:47:48 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.मा.राज्यपाल तथा अध्यक्ष, आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजन समिती, मुंबई.
२.मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३.मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,

७. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)
११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१२. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, (क्रीडा संचालनालयामार्फत)
१३. सर्व उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत),
१४. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
१५. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. निवड नस्ती (क्रीयुसे-२)